**जा.क्र. विप्र-3/राअसुअ-व्यापि-ऊस/मा.सु./272/2015**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**दिनांक:** 20/06/2015

**प्रति,**

1) विभागीय कृषि सह संचालक
औरंगाबाद / लातूर

2) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
औरंगाबाद, जालना, बीड , लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली

विषय :- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत ऊस विकास कार्यक्रम 2015-16
**अंतरिम मार्गदर्शक सूचना**

**संदर्भ** :- 1) **केंद्र शासनाचे पत्र क्र.** 3-1/2015-**सीयु-चार, दि.** 5/2/15 **व दि.** 15.4.15
2)**आयुक्तालयाचे पत्र जा.क्र.नगदीपिके/ऊस/15-16/207/15, दि.** 06.05.2015

ऊस पिकाच्या उत्पादकता वाढीसाठी कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत एकात्मिक ऊस विकास कार्यक्रम सन 2001-02 पासून राज्यात राबविण्यात येत होता. सदरची योजना सन 2013-14 मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत राबविण्यात आली. केंद्र शासनाने 12 व्या पंचवार्षिक योजनेत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत समावेश केल्यानुसार सन 2014-15 मध्ये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान - व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम राबविण्यात आला.

सन 2015-16 मध्ये संदर्भ 1 अन्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान व्यापारी पिके अंतर्गत ऊस पिकासाठी रु. 344 लाखाचा कार्यक्रम महाराष्ट्र राज्यासाठी तत्वत: निश्चित केला आहे. मागील वर्षी 100 टक्के केंद्र पुरस्कृत असलेला हा कार्यक्रम सन 2015-16 मध्ये केंद्र : राज्य 50 : 50 टक्के यानुसार राबविण्यात येणार आहे. त्यानुसार संदर्भ 2 अन्वये मागील वर्षीच्या देय खर्चासह (कमिटेड एक्स्पेंडीचर) सन 2015-16 मध्ये केंद्र हिस्सा रु. 190.96 लाख आणि राज्य हिस्सा रु. 172 लाख या नुसार एकूण रु. 362.96 लाख रक्कमेचा कार्यक्रम प्रस्तावित करण्यात आला आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम या योजनेअंतर्गत सन 2015-16 मध्ये रू. 344 लाख रकमेचा जिल्हानिहाय घटकनिहाय अंतरिम आर्थिक /भौतिक कार्यक्रम व मार्गदर्शक सुचना पाठविण्यात येत आहेत. सदर योजनेसाठी केंद्र शासनाकडून रु. 172 लाख व राज्यशासना कडून रु. 172 लाख या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर योजनेस राज्य शासनाची प्रशासकीय मंजुरी लवकरच अपेक्षित आहे. त्याप्रमाणे कार्यक्रम राबवण्यासाठी पुर्व तयारी बाबत क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांना सूचना देण्यात याव्यात. **सदर कार्यक्रम शासनाच्या मंजुरी नंतरच कार्यान्वयीत करावा** परिशिष्ट 1 मध्ये दर्शविल्याप्रमाणे तिमाही अहवाल तिमाही संपताच तर परिशिष्ट 2 मध्ये दर्शविल्याप्रमाणे मासिक अहवाल दर महिन्याच्या 5 तारखेस सादर करण्यात यावेत.

स्वाक्षरीत-/

सोबत-वरीलप्रमाणे

कृषि संचालक,
(विस्तार व प्रशिक्षण),
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत:-** माहितीस्तव सविनय सादर.

१) **मा. अपर मुख्य सचिव,** कृषि व  पशंसुवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई -32

2) **मा. मंत्री,** कृषि, महाराष्ट्र शासन, मुंबई- 32 यांचे स्वीय सहाय्यक.

3) **मा. राज्यमंत्री,** कृषि, महाराष्ट्र शासन, मुंबई- 32 यांचे स्वीय सहाय्यक

प्रत :   माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

1) संचालक, (**नि व गु.नि**), **आयुक्तालय**, **म.रा.पुणे**-1

प्रतिलिपी :

1) **मा.आयुक्त** साखर, साखर आयुक्तालय, साखर संकुल,शिवाजीनगर, पुणे- 5 यांना सस्नेह सादर.

2) **मा. कुलगुरु,** डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

3) **मा. कुलगुरु,** वसंतराव नाईक  मराठवाडा कृषि विद्यापीठ,  परभणी

4) **मा. कुलगुरु,** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि. अहमदनगर

5) **मा. कुलगुरु,** डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विदयापीठ, दापोली

6) **मा. जिल्हाधिकारी**

1)औरंगाबाद 2) जालना  3) बीड 4) लातूर 5) उस्मानाबाद  6) नांदेड   7) परभणी   8) हिंगोली

7) **संचालक (कृषि संशोधन व विस्तार)**,वसंतदादा साखर संस्था, मांजरी बुद्रुक, ता. हवेली,जि.पुणे

8) **ऊस पैदासकार** ,   1) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

2) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,  परभणी

3)  महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि. अहमदनगर

9) **कार्यकारी संचालक,** म.रा. सहकारी साखर कारखाना संघ, मुंबई 400 025.

10) **कार्यकारी संचालक,** वेस्ट इंडियन शुगर मिल असो.पुणे-5.

11) **ऊस विशेषज्ञ,** मध्यवर्ती ऊस संशोधन केद्र, पाडेगांव, ता.फलटण जि. सातारा.

12) **कक्ष अधिकारी,** राष्ट्रीय कृषि विकास योजना कक्ष, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - 32

13) **कार्यासन अधिकारी,** विप्र 1  व नियोजन, कृषि आयुक्तालय, म.रा.पुणे 5

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियाना अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम 2015-16 अंतरिम मार्गदर्शक सूचना

**प्रस्तावना**

ऊस हे महाराष्ट्रातील महत्वाचे नगदी पीक आहे. ऊसाच्या वाढीस लागणारे अनुकूल हवामान राज्यात उपलब्ध आहे. महाराष्ट्र राज्य देशात साखर उत्पादन व साखर उता-याच्याबाबतीत आघाडीवर आहे. परंतु सरासरी प्रती हेक्टरी ऊस उत्पादन कमी आहे. त्यामुळे ऊस उत्पादन प्रगत तंत्रज्ञान जास्तीतजास्त शेतक-यांपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे. शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन उत्पादन खर्च कमी केल्यास शेतक-यांना ऊस पिकातून शाश्वत व अधिक उत्पादन मिळु शकेल.

राज्यात सरासरी 8.86 लाख हेक्टर क्षेत्र उस पिकाखाली असून या पिकाची सरासरी उत्पादकता 82 मे.टन प्रती हेक्टर आहे. ऊस पिकाचा उत्पादन खर्च कमी करुन उत्पादकतेत 82 मे. टनावरुन 89 मे.टनापर्यंत वाढ करण्याच्या दृष्टीने सन 2015-16 मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानाअंतर्गत ऊस विकास कार्यक्रम राज्यात राबविण्यात येणार आहे.

सदर उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने योजनांतर्गत पुढील बाबींवर लक्ष केंद्रीत करण्यात आलेले आहे.

1. एक डोळा पध्दत वापरून पट्टा पध्दतीचा अवलंब करुन आंतरपीकाची प्रात्यक्षिके आयोजित करणे.
2. उती संवर्धित रोपाची लागवड करणे.
3. मनुष्यबळ विकास कार्यक्रम (राज्यस्तरीय प्रशिक्षण)

**(2) योजनेची उद्‌दिष्टे**

1. ऊसाच्या उत्पादन खर्चात कपात करुन उत्पादकता वाढविणे.
2. दर्जेदार बेण्याच्या वापरास प्रोत्साहन देणे यासाठी वसंतदादा साखर संस्था यांच्या मार्फत उती संवर्धित बेणे निर्मिती करुन शेतकऱ्यांना अनुदानावर उपलब्ध करुन देणे.
3. तंत्रज्ञान प्रसारासाठी शेतकरी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे.
4. विकसित तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी क्षेत्रिय स्तरावर आंतरपीकाची प्रात्यक्षिके आयोजित करणे.

**(3) ऊस पिकाच्या उत्पादकता वाढीतील उणिवा विस्तार माध्यमातून दूर करण्याच्या दृष्टीने नियोजित व उपाययोजना**

1. ऊस बेणे उत्पादनाची साखळी तयार करणे व दर्जेदार बेण्याचा वापर वाढविणे.
2. ऊस पिकाची शास्त्रीय पध्दतीने लागवड करणे.
3. शेतकरी व कर्मचारी यांचे ज्ञान अद्यावत करण्यासाठी प्रशिक्षण व प्रात्यक्षिके आयोजित करणे.
4. ऊस पिकात आंतर पीक घेण्यास प्रोत्साहन देणे.
5. पाण्याची बचत करण्यासाठी सूक्ष्म सिंचन पध्दतीस प्रोत्साहन देणे.

राज्यातील कृषि विभाग, कृषि विद्यापीठे, कृषि संशोधन संस्था, वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट व साखर कारखाने यांचे एकात्मिक प्रयत्नातून ऊस उत्पादकता वाढीसाठी तसेच ऊसात आंतरपीक लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी साखर कारखाना कार्यक्षेत्रात प्रकल्प स्वरुपात ऊस विकास कार्यक्रम राबविण्यात यावा. यामध्ये शासकीय अनुदानासोबतच कारखान्यांचा सहभाग असावा. कार्यक्रमाचे 10 हेक्टर क्षेत्राचे लहान गटात विभाजन करण्यात यावे.

**(4) कार्यक्रमातील बाबी**

1. एक डोळा पध्दतवापरून पट्टा पध्दतीचा अवलंब करुन आंतरपीकाचे प्रात्यक्षिके घेणे.
2. उती संवर्धित रोपे तयार करून शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देणे.
3. राज्यातील अधिकारी व कर्मचारी यांना ऊस पिकाचे अद्यावत प्रशिक्षण देणे.

निवडलेल्या जिल्हयात जिल्हयाच्या सरासरी उत्पादकतेपेक्षा कमी उत्पादकता असलेल्या तालुक्याची कार्यक्रम राबविण्यासाठी निवड करावी. तालुक्यातील प्रकल्प क्षेत्र निवडताना त्या तालुक्यातील सर्वात कमी उत्पादकता असणाऱ्या मंडळाची निवड करुन त्या क्षेत्रात प्रकल्प राबवावा. निवड केलेल्या क्षेत्राच्या बेस लाईन सर्व्हेचे काम पूर्ण करुन प्रकल्पातील उत्पादकतेच्या लक्षांकासह प्रकल्प आराखडा तयार करुन त्याला जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी मान्यता प्रदान करावी. निवडण्यात आलेला प्रकल्प क्षेत्राची निवड इतर कोणत्याही योजनेमध्ये करु नये. प्रकल्प क्षेत्राची एका पेक्षा जास्त प्रकल्पामध्ये निवड केल्याचे आढळून आल्यास अशा प्रकल्पाचा संपूर्ण खर्च वसूलपात्र राहील.

**(5) लाभार्थी निवड**

1. पंचायत राज संस्थेच्या सहभागाने प्रकल्प क्षेत्रातील लाभार्थी निवड करावी.
2. योजनेअंतर्गत लाभार्थी निवड करताना अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे.
3. जिल्ह्यातील अनुसुचित जाती (किमान 16.50 टक्के)/ अनुसूचित जमाती (किमान 8.50 टक्के) यांच्या लोकसंख्येच्या टक्केवारीच्या प्रमाणात लाभार्थ्यांची निवड करावी. तसेच सर्व प्रवर्गातील लाभार्थीच्या 30 टक्के महिलांची निवड करावी. जिल्ह्यासाठी प्राप्त होणारा आर्थिक कार्यक्रम राबविताना प्रवर्गनिहाय असलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात कार्यक्रम राबविण्यात यावा.
4. एका लाभार्थ्यास जास्तीत जास्त 0.40 हेक्टरच्या मर्यादेत लाभ देण्यात यावा.
5. प्रात्यक्षिकातील सर्व बाबी राबविण्याची लाभार्थ्याची तयारी असावी तशी जाणीव लाभार्थ्यांना करुन देण्यात यावी.
6. प्रात्यक्षिकामध्ये पट्टा पध्दतीचा अवलंब, एक डोळा पध्दतीने लागवड व आंतरपीके (कडधान्य, गळितधान्य इ.) या बाबी प्राधान्याने राबवावयाच्या असल्याने शेतकऱ्यांना त्याबाबत पूर्व कल्पना द्यावी.
8. सुक्ष्म सिंचन सुविधा असलेल्या / घेण्याची तयारी असलेल्या शेतकऱ्यंची प्रथम प्राधान्याने निवड करावी.
9. या पुर्वी लाभ दिलेल्या लाभार्थीच्या क्षेत्राची निवड करण्यात येऊ नये.

**(6) कार्यक्रम राबवावयाचे जिल्हे :-** ही योजना 8 जिल्हयात राबविण्यात यावी.

1)औरंगाबाद 2) जालना 3) बीड 4) लातूर 5) उस्मानाबाद 6) नांदेड 7) परभणी 8) हिंगोली

**(7) योजनेची अंमलबजावणी**

योजनांतर्गत कुठल्याही घटकांची कार्यवाही स्वतंत्रपणे न करता योजनेच्या अंमलबजावणीत समाविष्ट असलेल्या सर्व यंत्रणांकडून जसे साखर कारखाने, विस्तार यंत्रणा, कृषि विद्यापीठे, कृषि विज्ञान केंद्रे, अशासकिय संस्था, शेतक-यांच्या स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, इतर सेवाभावी संस्था यांचेकडून त्यांनी केलेल्या मूलभूत सर्वेक्षणाच्या आधारे त्यांना उत्पादन वाढीच्या दृष्टीने आढळलेल्या समस्यांचे आधारे स्थानिक गरजा विचारात घेऊन व सर्व घटकांचा एकत्रित विचार करुन कार्यक्रम राबविण्यात यावा. प्रकल्प आराखडा, अंमलबजावणी संनियंत्रण व परिणामकारकतेचा आढावा/यशोगाथा या बाबी अंतर्भूत राहतील. प्रकल्प आराखडा तयार करताना प्रकल्प अंमलबजावणी, सनियंत्रण व परिणामकारतेचा आढावा / यशोगाथा या बाबी यामध्ये अंतर्भूत आहेत. प्रकल्प यशस्वितेचा अहवाल / यशोगाथा संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सादर करावयाच्या आहेत. कार्यक्रमांतर्गत सर्व कृषि निविष्ठा खरेदीचे दर

/ अनुदानाचा दर इत्यादि सर्व बाबी या शासकीय दरानुसार व शासनाने मान्यता दिलेल्या पुरवठादार संस्थाकडून मागणी करुन प्रत्यक्ष क्षेत्रावर उपलब्ध करुन द्याव्यात जेणे करुन त्यात तफावत राहणार नाही.

- योजनेतील पुरवठा करावयाच्या निविष्ठा कृषि विद्यापीठाने शिफारस केलेल्या असाव्यात व सोबत दिलेल्या पॅकेजप्रमाणे निविष्ठा / औजारे इ. चा पुरवठा करावा. याबाबत दि. 21/04/2014 रोजी कृषि आयुक्तालयात संपन्न झालेल्या बैठकीत कृषि विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली हेक्टरी देय अनुदानाचे बाबनिहाय खर्च प्रमाणक सोबतच्या प्रपत्रात दर्शविलेले असून त्याचे अधिन राहून निविष्ठेची मागणी नोंदवावी.
- कृषि विदयापीठाने शिफारस केल्याप्रमाणे ऊस पिकाच्या वेगवेगळ्या वाढीच्या अवस्थेत शेतकऱ्यांना निविष्ठा पुरवठा वेळेत होईल या दृष्टीने हंगामनिहाय निविष्ठांची शासनमान्य पुरवठा संस्थांकडे मागणी नोंदविण्यात यावी.
- निविष्ठा पुरवठा झाल्यानंतर प्रत्येक तालुक्यामध्ये पुरवठा झालेल्या प्रत्येक निविष्ठांचे प्रत्येक लॉटचे नमुने काढून शासकीय प्रयोगशाळेतून तपासून घ्यावेत. नमुना पास झाल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच देयकांची अदायगी करण्यात यावी. अप्रमाणित बॅचच्या साठ्याची देयके अदा करु नयेत.

**(8) योजनेतील घटक**

**अ) एक डोळा पध्दतीचा अवलंब करुन पट्टा पध्दतीने आंतरपीकाची प्रात्यक्षिके आयोजित करणे**.

भारतीय कृषी अनुसंधान परिषद, कृषि विद्यापीठे व संशोधन संस्थांनी विकसित केलेले तंत्रज्ञान प्रसारासाठी प्रात्यक्षिके हे कृषि विस्ताराचे एक प्रभावी माध्यम आहे. ऊस लागवडीमध्ये योग्य हवामान, योग्य जमिनीचा वापर, दर्जेदार बेण्याचा वापर, बीज प्रक्रिया, एक डोळा पट्टा पध्दत, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, आंतरपीक, सिंचन व्यवस्थापन, सूक्ष्म मूलद्रव्याचा वापर, इ. तंत्रज्ञानाचा अवलंब करुन ऊस पिकाची उत्पादकता वाढविणे शक्य आहे. त्यासाठी विकसित तंत्रज्ञान प्रसारासाठी प्रात्यक्षिके आयोजित करावीत.

आपल्या क्षेत्रातील ऊस उत्पादनाच्या प्रमुख समस्या विचारांत घेऊन त्यावर प्रभावी उपाय योजना करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग करुन घेणे अपेक्षित आहे. प्रात्यक्षिके प्रगतशिल शेतकऱ्याच्या प्रक्षेत्रावर घ्यावीत. प्रात्यक्षिक आयोजित करताना ऊस बेण्याची प्रक्रिया, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, आंतर पिकाचे बियाणे पुरवठा, आंतर पिकासाठी जैविक खते/जैविक एजंट्स, मुख्य पिक ऊस आणि आंतरपिकासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन इत्यादि बाबींसाठी दिलेल्या मर्यादेपर्यंत अर्थसहाय्य देय राहील.

- **बियाणे प्रक्रिया**

ऊसाच्या पिकाच्या सुरवातीच्या वाढीच्या कालावधीत कीड व रोगापासून बचाव व्हावा यासाठी मॅलेथिऑन, कार्बेडेझिम यासारख्या कीड/बुरशीनाशकांची तर नत्र स्थिरीकरणाद्वारे, स्फुरद उपलब्धतेद्वारे पिकाच्या वाढीस चालना देण्यासाठी ॲसिटोबॅक्टर, पीएसबी यासारख्या जिवाणु खतांची प्रक्रिया करण्यात यावी.

- **ऊती संवर्धित रोपे अनुदानावर वाटप**

ऊस पिकाच्या लागवडीत सुधारित वाणांच्या दर्जेदार बेण्याच्या लागवडीस खूप महत्व आहे. ऊस पिकाचा कालावधी, कीड/रोगाचा संभाव्य प्रादुर्भाव इत्यादिचा विचार करता उती संवर्धित रोपे उच्च गुणवत्तेची, जोमदार, एकसारख्या वाढीची, कीड/रोगमुक्त अशी असतात. त्यामुळे ऊसाचा बेणेमळा उती संवर्धित रोपांपासून तयार केल्यास त्याचा निश्चितच फायदा होतो. अशा बेणे मळ्यातून लागवड साहित्य प्रात्यक्षिकांतर्गत प्राधान्याने वापरण्यात यावे.

यासाठी सन 2015-16 मध्ये वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट, या संस्थेमार्फत ऊती संवर्धित रोपे तयार करुन उपलब्ध करुन दिली जाणार असून जवळपास 4 लाख रोपाच्या निर्मितीसाठी रक्कम रुपये 3.50 प्रति रोप प्रमाणे राज्यासाठी एकूण रक्कम रुपये 14 लाख उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. उती संवर्धित रोपांची मागणी नोंदविणा-यांना प्रथम येणा-यास प्राधान्य या तत्वावर रोपाची मागणी नोंदवून त्याप्रमाणे ऊती संवर्धित रोपाचा पुरवठा वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट, कडून केला जाईल. अनुदानाव्यतिरिक्त रक्कम शेतक-यास भरावी लागेल. सदरची रोपे शक्यतोवर पुढील हंगामासाठी लागवड साहित्य म्हणून उपलब्ध होतील अशा पध्दतीने बेणे मळ्याचे नियोजन करावे.

- **एकात्मिक अन्नद्रव्य व्यवथापन**

अधिक उत्पादन देणाऱ्या सुधारीत वाणांचा वापर, सेंद्रिय खतांचा अत्यल्प व अनियमित वापर, रासायनिक खतांचा असंतुलित वापर, सुक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खतांचा अत्यल्प वापर, जमिनीला विश्रांती न देणे, पिकांची योग्य फेरपालट न करणे, नेहमी एकाच जमीनीतून एकाच पिकाचे उत्पादन घेणे, जमीनीचा सामु जास्त असणे, मुक्त चुन्याचे प्रमाण जास्त असणे, इत्यादी अनेक कारणांमुळे सुक्ष्म अन्नद्रव्यांची जमीनीमध्ये उपलब्धता कमी जाणवते व त्याच्या कमतरतेमुळे पीक वाढीवर अनिष्ठ परिणाम दिसून येतो. पर्यायाने ऊस व साखर उत्पादनात घट येते.

मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र पाडेगाव यांनी केलेल्या संशोधनानुसार महाराष्ट्रातील ऊसाखालील जमिनीमध्ये जस्त, लोह, मँगनीज आणि बोरॉन या चार सूक्ष्म मूलद्रव्यांची प्रकर्षाने कमतरता जाणवते.

**<u>जस्त युक्त खतांचा वापर</u>**

मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगांव येथे झालेल्या संशोधनाच्या निष्कर्षावरुन असे दिसून आले की, जस्तांची कमतरता असलेल्या जमीनीत ऊस लागवड करताना **प्रति हेक्टरी 20 किलो झिंक सल्फेट शेणखतात मुरवून दिल्यास ऊस उत्पादनात भरघोस वाढ होते.** खोडवा पिकास देखिल 20 किलो झिंक सल्फेट प्रति हेक्टरी वापरल्यास उत्पादन वाढते.

किंवा झिंक सल्फेट 0.5 ते 1.0 % (10 लिटर पाण्यात 50 ते 100 ग्रॅम झिंक सल्फेट) 15 ते 21 दिवसांच्या अंतराने आवश्यकतेनुसार 2 ते 3 वेळा फवारल्यास फायद्याचे दिसून आले आहे. खारवट- चोपण जमीनीत किंवा खारवट पाणी असल्यास प्रति हेक्टरी 20 किलो झिंक सल्फेट वापरावे.

**<u>लोहयुक्त खतांचा वापर</u>**

मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र पाडेगांव येथील संशोधनावरुन, लोहाची कमतरता असणाऱ्या जमीनीत नविन लागवडी केलेल्या व खोडवा ऊसाला **प्रत्येकी 25 किलो फेरस सल्फेट प्रती हेक्टरी शेण खतात मिसळुन दिल्यास ऊस उत्पादनात भरीव वाढ झाल्याचे दिसून आले आहे.**

किंवा फेरस सल्फेट 0.5 ते 1 % (10 लिटर पाण्यात 50 ते 100 ग्रम फेरस सल्फेट) 15 ते 21 दिवसांच्या अंतराने 2 ते 3 वेळा फवारल्यास ऊस उत्पादन वाढल्याचे दिसून आले.

तसेच खारवट - चोपण जमीन किंवा पुरबुडीत क्षेत्राच्या ठिकाणी हेक्टरी 50 किलो फेरस सल्फेट वापरल्यास ऊस उत्पादन व साखर उतारा वाढल्याचे दिसून आले आहे.

**<u>मंगलयुक्त खतांचा वापर</u>**

ज्या जमीनीत मंगलची कमतरता आहे अशा जमीनीत प्रति हेक्टरी 10 किलो मॅंगनिझ सल्फेट वापरावे किंवा मॅंगनिझ सल्फेट 0.5 ते 1.0 % (10 लिटर पाण्यात 50 ते 100 ग्रम मॅंगनिझ सल्फेट) तिव्रतेच्या द्रावणाच्या गरजेनुसार 2 ते 3 फवारण्या कराव्यात.

**बोरॉन युक्त खतांचा वापर**

बोरॉनची कमतरता असल्यास ऊस पिकासाठी 5 किलो बोरॅक्स प्रति हेक्टरी वापरावे किंवा बोरॅक्स 0.2 ते 0.5 % (10 लिटर पाण्यात 20 ते 50 ग्रॅम बोरॅक्स) तिव्रतेच्या द्रावणाची आवश्यकतेनुसार 2 ते 3 वेळा फवारणी करावी.

**सुक्ष्म अन्नद्रव्य वापरासंबंधी महत्त्वाच्या बाबी.**

1) माती परिक्षण अहवालानुसारच सुक्ष्म मुलद्रव्यांच्या कमतरतेवर उपाययोजना कराव्यात.

2) ऊसासाठी शिफारस केल्याप्रमाणेच सुक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खतांचा वापर करावा.

3) तृणधान्य पिके तांबे व जस्त जास्त प्रमाणात शोषतात तर कडधान्य पिके बोरॉन व मॉलिब्डेनम जास्त प्रमाणात शोषतात म्हणून कडधान्य व तृणधान्य पिकांची फेरपालट करावी.

4) सुक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खते ही शेणखतात मिसळून दिल्यास अधिक फायद्याचे ठरते.

ऊसासाठी सुक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असणा-या जमीनीत माती परिक्षणानुसार सुक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खतांचा वापर केल्यास ऊस व साखर उत्पादनात भरघोस वाढ होते.

**3.ऊस पिक आधारित अन्नधान्य पिकांशी निगडित पीक पध्दती आणि आंतरपिके**

उष्ण कटीबंधीय प्रदेशासाठी ऊस पिक आधारित अन्नधान्य पिकांशी निगडित पीक पध्दती कृषि विद्यापीठाकडून निश्चित करुन घ्यावी. प्रात्यक्षिकाचे आयोजन करताना त्या पध्दतीचा अवलंब करावा.

- बाजरी – पूर्वहंगामी ऊस / खोडवा / गहू
- भात / ऊस / खोडवा / नागली
- भात / ऊस / खोडवा / उडीद
- भात / ऊस / खोडवा / तीळ (Sesamum indicum)
- कापूस / ऊस / खोडवा / गहू
- ऊस / खोडवा / खरिप भात / उन्हाळी भात

**आंतरपिके**

ऊसाच्या सुरवातीच्या वाढीच्या अवस्थेत पिकाने संपूर्ण क्षेत्र वापरण्यापर्यंतच्या कालावधीत हरभऱ्यासारखे आंतरपिक घेता येते. यामुळे शेतकऱ्यास अधिकचे उत्पादन तर मिळतेच शिवाय जमिनीचा पोत सुधारण्यासदेखील मदत होते. यासाठी ऊस पिकात कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार आंतरपिक घेण्याकरिता बियाणे, एकात्मिक मुलद्रव्य व कीड व्यवस्थापन इ. साठी अर्थसहाय्य देय आहे.

इतर पूरक कार्यक्रम

राष्ट्रीय जमीन आरोग्य अभियान अंतर्गत मृद चाचणी करताना सदर प्रात्यक्षिक क्षेत्राचा प्राधान्याने आंतर्भाव करावा. खताच्या मात्रा जमीन सुपिकता निर्देशांक व मृद चाचणी अहवालानुसार देण्यात याव्यात. पिकाच्या उर्वरित अंशाचा पुर्नवापर, जैविक - हिरवळीच्या खताच्या वापरास प्रोत्साहन, सरीआड सरी पाण्याचा वापर इत्यादिचा वापरास प्रोत्साहन द्यावे. सुक्ष्म सिंचन उपलब्ध नसल्यास सूक्ष्म सिंचन योजनेमधून या प्रात्यक्षिक क्षेत्रास प्राधान्याने लाभ द्यावा.

आपल्या क्षेत्रातील ऊस उत्पादनाच्या प्रमुख समस्या विचारांत घेऊन त्यावर प्रभावी उपाय योजना करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग करुन घेणे अपेक्षित आहे. प्रात्यक्षिके प्रगतशिल शेतकऱ्याच्या क्षेत्रावर घ्यावीत.

- **सूक्ष्म सिंचन**

महाराष्ट्र शासनाने पुढील 5 वर्षात ऊस पिकाखालील संपूर्ण क्षेत्र टप्याटप्याने सूक्ष्म सिंचनाखाली आणण्याचे धोरण निश्चित केले आहे. त्यामुळे या प्रात्यक्षिकांसाठी राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान (National Mission on Sustainable Agriculture) अंतर्गत शेतावरील पाणी व्यवस्थापन (On farm water management) योजनेतून प्रथम प्राधान्याने सूक्ष्म सिंचन संच त्या योजनेच्या मार्गदर्शक सुचनांच्या अधिन राहून देय राहील. याबाबत संचालक फलोत्पादन यांचेमार्फत संबंधित योजनेच्या निर्गमित मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करावा.

कृषि विद्यापीठांनी शिफारस केल्यानुसार निविष्ठा (Critical Inputs) खरेदीसाठी प्रति हेक्टरी रुपये 8000/- अनुदान देय आहे. शेतकऱ्याच्या शेतावर किमान 0.40 हेक्टर क्षेत्रावर एक डोळा पध्दतीचा अवलंब करुन पट्टा पध्दतीने अंतरपीकाचे प्रात्यक्षिके घेण्यात यावे. याबाबत खालील खर्च प्रमाणकाच्या मर्यादेतच निविष्ठावर खर्च करण्यात यावा.

**NFSM Intercropping System based Demonstration Package (1ha) : 2015-16**
**Crop- Sugarcane (paired row)+Gram(2:2) Approved rate Rs.8000/-**

| Sr. No. | Component | Input | Upper subsidy limit ( Rs) | Rate of Application /Unit | Total Amount (RS.) | Beneficiary Share |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Set Treatment (base crop) | Malathion | | 300 ml. | 75.00 | |
| | | Carbendazim (0.1%) | | 100 gms. | | |
| | | Acetobactor | | 10 kg. | 428.00 | |
| | | PSB | | 1.250 gms. | | |
| 2 | INM | ZnSo4, | | 20 kg. | 800.00 | |
| | | FeSo4, | | 25 kg. | 425.00 | |
| | | MnSo4 | | 10 kg. | 475.00 | |
| | | Boron | | 5 kg. | 1700.00 | **823** |
| 3 | Seed (Inter crop ) | Gram | | 40 kg | 2800.00 | |
| 4 | Biofertilizer/Bioagents (Inter crop ) | Rhizo&PSB/ Trichoderma or Pseudomons fluoresence | | As per Recommendation of SAU | 100 | |
| 5 | IPM(base crop) | Chlorpyriphos / Phorate 10G | | 1 Ltr./10Kg | 235.00 | |
| | | Diamethoate | | 1 Ltr. | 285.00 | |
| 6 | IPM(intercrop) | Bt/HaNPV | | | 500.00 | |
| 7 | Contingency | | | | 1000.00 | |
| | **Total** | | | | **8823.00** | |

टीप 1. प्रति हेक्टरी कमाल देय मर्यादा रु. 8000/- प्रति हेक्टर आहे. याव्यतिरिक्त येणारा खर्च लाभार्थीने करावयाचा आहे.

3. निविष्ठांचे दर अस्थायी स्वरुपाचे असून शासनाने/ कृषि आयुक्तालयाने (निविष्ठा व गुण नियंत्रण) निश्चित केलेले दर अंतीम समजण्यात यावेत.
4. पीक संरक्षण उपचार हे लाक्षणीक (इंडीकेटीव्ह) स्वरुपाचे असून ही औषधे प्लं्ट प्रोटेक्शन श्येड्युल (पीक संरक्षण पुस्तिका) आणि सीआयबी तसेच आरसी लेबल क्लेमच्या अधिन राहून वापरण्यात यावीत. <u>या प्रात्यक्षिकांतर्गत रासायनिक खतांकरीता कोणत्याही परिस्थितीत अर्थसहाय्य देण्यात येऊ नये.</u>
1. सन 2015-16 मध्ये सदर अर्थसहाय्य केंद्र : राज्य :: 50 : 50 टक्के यानुसार देय असल्याने त्यानुसार खर्च आणि नोंदी होतील याची दक्षता घेण्यात यावी.

### 5. निविष्ठांची खरेदी

पीक प्रात्यक्षिके राबविण्यासाठी आवश्यक त्या सर्व निविष्ठांची मागणी विभागीय कृषि सह संचालक यांच्या अध्यक्षतेखालील समितीची मान्यता घेऊन शिफारस केलेल्या मात्रांनुसार निविष्ठा पुरवठा आदेश कृषि संचालक (नि.व गु.नि.) यांनी निश्चित केलेल्या पुरवठादार संस्थेकडेच मागणी नोंदवुन त्याची प्रत आयुक्तालयास पृष्ठांकित करावी. सर्व निविष्ठा वेळेत उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित उप विभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व विभागीय कृषि सह संचालक यांची राहील. पुरवठा केलेल्या निविष्ठा कोणत्याही परिस्थितीत पडून राहणार नाही याची दक्षता विभागीय कृषि सह संचालक यांनी घ्यावी.  अनुज्ञेय असलेले अनुदान वजा जाता उर्वरित रक्कम लोकवाटा म्हणून शेतकऱ्यांकडून घेऊन संबंधित संस्थेकडे भरणा करावी.

अधिकृत पुरवठादार संस्था व औषधांचे दर इत्यादीचा  तपशिल आयुक्तालयाच्या नि. व गु.नि., कक्ष-5 शाखेकडील पत्र क्र. जा.क्र. सीपीएस/जैकिना/मा.सु./2014-15/80/गुनि/2014, दिनांक 22 मे, 2014 व तदनंतरच्या परिपत्रकानुसार राहील. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

प्रात्यक्षिकांत केवळ कृषि विद्यापीठांनी शिफारस केलेल्या तंत्रज्ञानाचा व वापर निविष्ठांचाच करावा. इतर शिफारस न केलेल्या निविष्ठांचा परस्पर वापर केल्यास त्याची रक्कम वसूल केली जाईल, याची नोंद घ्यावी. <u>या प्रात्यक्षिकाशेजारी त्याच्या तुलनेसाठी शेतकरी करीत असलेल्या पारंपारिक पध्दतीने तेवढयाच क्षेत्राचा कन्ट्रोल प्लॉट घ्यावा व दोन्ही प्लॉटच्या पिकाच्या लागवडीपासून वापरलेल्या निविष्ठांच्या व इतर सर्व बाबींच्या नोंदी ठेवाव्यात. त्यासाठी झालेल्या खर्चाची नोंद व उत्पन्नाची व प्रात्यक्षिक क्षेत्रासाठी झालेल्या खर्चाची व आलेल्या उत्पादनाची सांख्यिकी पध्दतीने नोंद ठेवणे आवश्यक राहील.</u> प्रात्यक्षिकास परिसरातील शेतक-यांच्या ऊस पिकाच्या वेगवेगळया वाढीच्या अवस्थेत भेटी आयोजित करुन शेतक-यांना तुलनात्मक फरक दाखवावा. या आधारे तालुका/जिल्हयातील 2-3 निवडक यशोगाथा कृषि आयुक्तालयास सादर कराव्यात. प्रत्येक प्रात्यक्षिकामध्ये ठळकपणे दिसेल अशा रितीने दर्शनी भागात फलक लावावा व त्यावर प्रात्यक्षिकाबाबत सविस्तर तपशिल लिहावा. संपूर्ण प्रात्यक्षिक कालावधीत पिकाच्या वाढीच्या अवस्थेचे टप्पे निश्चित करुन त्या त्या वेळेस प्रात्यक्षिक व कंट्रोल प्लॉटची छायाचित्रे घ्यावीत.

प्रात्यक्षिकाचे यशस्वी आयोजन व शेतक-यांना द्यावयाच्या मार्गदर्शनासाठी एका चमूची नियुक्ती करावी. आयोजित केलेल्या प्रात्यक्षिकास तालुका कृषि अधिकारी, उप विभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि सह संचालक यांनी भेटी देऊन मार्गदर्शन करावे. एकाच प्रात्यक्षिकास सर्व वरिष्ठ अधिका-यांनी भेटी न देता जास्तीत जास्त प्रात्यक्षिकास मार्गदर्शनपर भेटी होतील, असे नियोजन करावे.

**प्रात्यक्षिकांबाबत अभिलेख खालील प्रपत्रात नोंदवावेत.**

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम** 2015-16

गाव : तालुका : जिल्हा :

लाभार्थीचे नाव: सर्वे/गट नंबर :

प्रात्यक्षिक प्लॉटचे क्षेत्र : कन्ट्रोल प्लॉटचे क्षेत्र :

| स्थानिक | पध्दतीनुसार | (प्रात्यक्षिक | झालेला खर्च | | कमी / अधिक खर्च | संभाव्य कारणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्थानिक पध्दतीनुसार (कन्ट्रोल प्लॉट) | सुधारित पध्दतीनुसार (प्रात्यक्षिक क्षेत्र) | | |

टीप : प्रस्तावित प्रात्यक्षिक क्षेत्रात ऊस उत्पादकतेचे उद्दिष्ट हे सद्यस्थितीतील ऊस उत्पादकतेपेक्षा किमान 5 टन जादा (प्रति प्रात्यक्षिक 0.4 हेक्टर( याप्रमाणे ठरविण्यात यावे. तसेच ते साध्य होईल हे पहावे.

**ब) ऊती संवर्धितत रोपे तयार करुन अनुदानावर वाटप करणे.**

ऊस पिकाच्या लागवडीत सुधारीत वाणांच्या दर्जेदार बेण्यांच्या लागवडीस खूप महत्व आहे.ऊस पिकाचा कालावधी,कीडा/रोगंचा संभाव्य प्रादुर्भाव इ.विचार करता ऊती संवर्धित रोपे उच्च गुणवत्तेची,जोमदार,एकसारख्या वाढीची कीड/रोगमुक्त असतात. त्यामुळे ऊसाचा बेणेमळा ऊती संवर्धित/रोपांपासून तयार केल्यास त्याचा निश्चितच फायदा होतो. यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट या संस्थेमार्फतो ऊती संवर्धितं रोपे तयार करुन उपलब्ध करुन दिली जाणार आहे. रुपये 3.50 प्रति रोप अनुदान याप्रमाणे 4 लाख रोपंच्या निर्मितीसाठी रक्कम रुपये 14 लाखाची 4 तरतूद करण्यात आलेली आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर ऊती संवर्धित रोपे लाभधारक शेतकऱ्यांना वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट या संस्थेकडून उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. अनुदाना व्यतिरिक्तची रक्कम लाभधार शेतकऱ्यानी भरावयाची आहे. सदरची रोपे पुढील हंगामासाठी लागवड साहित्य म्हणून उपलब्ध होतील अशा पध्दतीने बेणे मळयाचे नियोजन करावे.

**क) मनुष्य बळ विकास कार्यक्रम (अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षण)**

अधिकारी कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेण्यासाठी विभागस्तराव 2 दिवसांचे 20 प्रशिक्षणार्थी यांचे प्रशिक्षण घेण्यात 2 यावे.सदर प्रशिक्षण वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचेमार्फत आयोजित करण्यात यावीत. तसेच वसंतदादा शुगर इंन्स्टीट्युट,मांजरी,पुणे यांचेमार्फत देखील ही प्रशिक्षणे आयोजित करता येतील. प्रशिक्षणाची सविस्तर रुपरेषा कृषि विद्यापीठाशी/व्हीएसआयशी समन्वय साधून निश्चित करावी. विभागीय कृषि सह संचालक औरंगाबाद व लातूर यांनी आपल्या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची प्रशिक्षणासाठी निवड करावी. प्रशिक्षण शास्त्रज्ञंमार्फत देण्यात यावे. प्रशिक्षणासाठी खालीलप्रमाणे बाबनिहाय खर्चाचा तपशिल. देण्यात येत असून त्याप्रमाणे खर्च करण्यात यावा.

| अ.क्र | घटक | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| 1 | व्याख्यात्यांना मानधन (रु.500/- प्रति व्याख्यान प्रमाणे( 10 व्याख्यानासाठी | 5000 |
| 2 | उद्घाटन कार्यक्रमासाठी 50 व्यक्तींसाठी रु. 50/- प्रति व्यक्ती याप्रमाणे अल्पोपहार | 2500 |
| 3 | भोजन व्यवस्था व राहण्याची व्यवस्था रु.500/- प्रति प्रशिक्षणार्थी | 20000 |
| 4 | प्रशिक्षणार्थी साहीत्य,स्टेशनरी,छपाई,प्रसिध्दी इत्यादी रुपयें 400 प्रति प्रशिक्षणार्थी | 8000 |
| 5 | इंधन व प्रशिक्षणासाठीच्या प्रक्षेत्रावरील भेटी वाहन भाडे व त्या अनुषंगाने येणारा किरकोळ खर्च | 4500 |

| | | |
|---|---|---|
| | **एकूण** | 40000 |

प्रशिक्षणाच्या आयोजनाबाबतं सविस्तर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रशिक्षणाच्या आयोजनासाठी तरतूद उपलब्ध करुन दयावी. प्रशिक्षण शक्यतो हंगाम सुरु होण्यापुर्वी आयोजित करावे जेणेकरुन हंगामात शेतक-यांना मार्गदर्शन करताना/त्याचा लाभ होईल.आयोजित प्रशिक्षणावर झालेल्या खर्चाचा सविस्तर तपशील आणि उपयोगिता प्रमाणपत्र कृषि विद्यापीठ/व्हीएसआय कडून प्राप्त करुन घ्यावे.

**योजनांतर्गत ज्या लाभार्थीना या पुर्वी लाभ देण्यात आला आहे, अशा लाभार्थीच्या क्षेत्राची निवड करणे व पुन्हा अनुदान दिले जाणार नाही याची दक्षता घ्यावी.**

### 9) योजनेचे संनियंत्रण

योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीच्या दृष्टीने खालील टक्केवारीच्या प्रमाणात योजना अंमलबजावणीच्या खर्चाची तपासणी करावी.मतपासणी मध्ये योजनेतील सर्व बाबींचा अंतर्भाव. तपासणीचा अहवाल मासिक प्रगती अहवाल सोबत नियमितपणे पुढील महिन्याच्या 5 तारखेपर्यन्त आयुक्तालयास पाठवावा.

| **अ.क्र.** | तपासणी अधिकारी | तपासणी टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | विभागीय कृषि सहसंचालक | 0.25% |
| 2 | जिल्हा अधिक्षक कृषिं अधिकारी | 1 % |
| 3 | उप विभागीय कृषिं अधिकारी | 5 % |
| 4 | तालुका कृषि अधिकारी | 10 % |
| 5 | मंडल कृषि अधिकारी | 50 % |
| 6 | कृषि पर्यवेक्षक/कृषि सहाय्यक | 100 % |

प्रत्येक महिन्यात विभागीय कृषि सहसंचालक यांनी किमान एका प्रकल्पाला भेट द्यावी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी 3 प्रकल्पांना भेट द्यावी. कृषि उपसंचालक यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील 50 टक्के प्रकल्पांना भेटी द्याव्यात. भेट देणा-या अधिका-यांनी निविष्ठा पुरवठा व इतर यकार्यक्रमांचा आढावा घ्यावा. भेट नोंदवहीमध्ये तशी नोंद करावी व शे-यामध्ये सूचना लिहाव्यात.

**सन 2015-16 मधील वैयक्तिक लाभधारकांची यादी तालुका कार्यालय/पंचायत समिती/जिल्हाधिकारी कार्यालयात संबधीत कार्यालय प्रमुख / पदाधिकारी यांची मान्यता घेवुन लावण्यात यावी.निवडलेल्या लाभार्थीची यादी कृषि विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावी.**

### 10) योजनेवरील प्रागतिक खर्चाबाबत

योजनेचा तिमाही खर्च व भौतिक साध्य खाली दर्शविलेल्या टक्केवारीपेक्षा कमी असणार नाही, याची संबंधितांनीं नोंद घ्यावी.

| **अ.क्र.** | **कालावधी** | **खर्चाची टक्केवारी** | **प्रागतिक टक्केवारी** |
|---|---|---|---|
| 1 | जुलै ते सप्टेंबर | 20 | 20 |
| 2 | आक्टोबर ते डिसेंबर | 40 | 60 |
| 3 | जानेवारी ते मार्च | 40 | 100 |

विभागीय कृषि सह संचालक व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी वेळोवेळी आढावा घेऊन तसा अहवाल पाठवावा.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रत्येक महिन्याला योजनेचा आढावा घेऊन तालुकानिहाय जिल्हयाचा मासिक प्रगती अहवाल ईमेल व्दारे व लेखी, विभागीय कृषि सह संचालक यांचेमार्फत प्रत्येक महिन्याच्या 5 तारखेपर्यंत सादर करावा.

योजनेचे उपयोगीता प्रमाणपत्र केंद्र शासनास प्रत्येक तिमाही नंतर सादर करावे लागतात.त्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषिं अधिंकारी यांना सूचित करण्यात येते की, योजनेचा जून,सप्टेंबर,डिसेंबर व मार्च तिमाहीची उपयोगीता प्रमाणपत्र व तिमाही प्रगती अहवाल,तिमाहीनंतर पुढील महिन्याच्या 5 तारखे पर्यंत विभागीय कृषि सह संचालक कार्यालयामार्फत कृषि आयुक्तालयास सादर करावेत.

विभागीय कृषि सह संचालक व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना संगणकीय प्रणालीव्दारे अनुदानाचे वितरण करण्यात येईल. संगणकीय प्रणालीव्दारे उपलब्ध करुन दिलेले अनुदान महिनानिहाय पूर्णपणे खर्च होईल याची दक्षता घ्यावी.

विभागीय कृषि सह संचालक यांचे स्तरावर प्राप्त झालेल्या मासिक प्रगती अहवाल त्यांनी ईमेल व्दारे व लेखी सोबत दिलेल्या प्रपत्रात या कार्यालयास सादर करावे. विभागीय कृषि सह संचालक यांनी त्यांचे मासिक प्रगती अहवाल ई मेल व्दारे ddacashcrop@gmail.com या पत्त्यावर प्रत्येक महिन्याच्या 5 तारखेपर्यंत पाठवावेत. तसेच विभागाचे तिमाही प्रगती अहवाल आणि उपयोगीता प्रमाणपत्र सोबत दिलेल्या प्रपत्रामध्ये प्रत्येक तीन महिन्यानंतर या कार्यालयास सादर करावेत. **आहरण व संवितरण अधिकारी** — या कार्यक्रमाकरिता सन 2015-16 साठी आयुक्तालय स्तरावर सहाय्यक संचालक लेखा 1,कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे 1,विभाग स्तरावर विभागीय कृषि सह संचालक यांचे कार्यालयाती लेखाधिकारी,जिल्हा स्तरावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालयातील सहाय्यक लेखाधिकारी, तालुकास्तरावर तालुका कृषि अधिकारी हे आहरण व संवितरण अधिकारी राहतील.

स्वाक्षरीत-/

कृषि संचालक,
(विस्तारगवीप्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य,पुणे

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत ऊस विकास कार्यक्रम 2015-16

# (योजनेतील समाविष्ट घटक)

| अ. क्र. | योजनेतील घटक | अनुदानाचा दर (रूपये ) | भौतिक लक्षांक | आर्थिक तरतूद (रू.लाखात) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | एकूण |
| 1 | एक डोळा पटटा पध्दतीचा अवलंब करून आंतरपीक प्रात्यक्षिके (हेक्टर) | **रु.8000/- हे.** | 4090 | 163.60 | 163.60 | 327.20 |
| 2 | उती संवर्धित रोपे (लाखात) | **रु.3.50/- रोप** | 4 लाख | 7.00 | 7.00 | 14.00 |
| 3 | राज्यस्तरीय प्रशिक्षण (संख्या) | **रु.**40000/- प्रशिक्षण | 7 | 1.40 | 1.40 | 2.80 |
| **एकूण** | | | | 172.00 | 172.00 | 344.00 |

*राष्ट्रीय अन्न* सुरक्षा अभियानांतर्गत *ऊस विकास कार्यक्रम* 2015-16 जिल्हा व बाबनिहाय भौतिक व आर्थिक कार्यक्रम (अर्थिक तरतूद रूपये लाखात)

| अ.क्र. | जिल्हा | सर्वसाधारण क्षेत्र (2006-10) " 00 हेक्टर " | प्रकल्प संख्या | एक डोळा आंतरपीक प्रात्यक्षिके (रू. 8000/-हे) | | उती संवर्धित रोपे (लाखा)(रू 3.50/- रोपे ) | | राज्यस्तरीय प्रशिक्षण (रू.40000/- प्रशिक्षण ) | | आर्थिक कार्यक्रम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | भौतिक लक्षांक | आर्थिक तरतूद | भौतिक लक्षांक | आर्थिक तरतूद | भौतिक लक्षांक | आर्थिक तरतूद | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | एकूण |
| 1 | औरंगाबाद | 213 | 38 | 380 | 30.40 | 0 | 0 | 0 | 0000 | 15.20 | 15.20 | 30.40 |
| 2 | जालना | 201 | 36 | 360 | 28.80 | 0 | 0 | 0 | 0.00 | 14.40 | 14.40 | 28.80 |
| 3 | बीड | 534 | 96 | 960 | 76.80 | 0 | 0 | 0 | 0 | 38.40 | 38.40 | 76.80 |
| विभागीय स्तर | | 0 | 0 | 0 | 0.00 | 0 | 0 | 3 | 1.20 | 0.60 | 0.60 | 1.20 |
| **औरगाबाद विभागी** | | **948** | **170** | **1700** | **136.00** | **0** | **0** | **3** | **1.20** | **68.60** | **68.60** | **137.20** |
| 4 | लातूर | 450 | 78 | 780 | 62.40 | 0 | 0 | 0 | 0 | 31.20 | 31.20 | 62.40 |
| 5 | उस्मानाबाद | 421 | 76 | 760 | 60.80 | 0 | 0 | 0 | 0.00 | 30.40 | 30.40 | 60.80 |
| 6 | नांदेड | 214 | 38 | 380 | 30.40 | 0 | 0 | 0 | 0.00 | 15.20 | 15.20 | 30.40 |
| 7 | परभणी | 157 | 28 | 280 | 22.40 | 0 | 0 | 0 | 0.00 | 11.20 | 11.20 | 22.40 |
| 8 | हिंगोली | 106 | 19 | 190 | 15.20 | 0 | 0 | 0 | 0 | 7.60 | 7.60 | 15.20 |
| विभागीय स्तर | | 0 | 0 | 0 | 0.00 | 0 | 0 | 4 | 1.60 | 0.80 | 0.80 | 1.60 |
| **लातूर विभाग** | | **1348** | **239** | **2390** | **191.20** | | | **4** | **1.60** | **96.40** | **96.40** | **192.80** |
| आयुक्तालय स्तर | | | | | | | | | | 7.00 | 7.00 | 14.00 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण** | 2296 | 409 | 4090 | 327.20 | **4लाख** | 14.00 | 7 | 2.80 | 172.00 | 172.00 | 344.00 |

## **परिशिष्ट** – 1

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियात्र योजनेअंतर्गत ऊस विकास कार्यक्रम 2015-16

## तिमाही मासिक प्रगती अहवालाचे प्रपत्र

जिल्हयाचे नाव - माहे जुनमार्च/डिसेंबर/सप्टेंबर/-------अखेर

| **अ. क्र.** | **गाव/ तालुका/ जिल्हा/** | **भौतिक** | | | | | | | **वा ण** | **निविष्ठा पुरवठयाचा तपशील** | **आर्थिक** (रक्कम रू. लाख) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लक्षांक | साध्य | लाभार्थी संख्या | | | | | | | लक्षांक | प्राप्त तरतुद | खर्च |
| | | | | अनु जाती | अनु जमाती | इतर | **एकूण** | पैकी महिला | | | | | |

अहवालासोबत खालील मुद्यांवर माहिती द्यावी.

- विस्तार कार्यक्रम
- पीक परिस्थिती

## **परिशिष्टम** 2

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान योजनेअंतर्गत ऊस विकास कार्यक्रम 2015-16

## मासिक प्रगती अहवालाचे प्रपत्र

माहे . . . अखेर

कार्यान्वित अधिकारी - जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

**अ)भौतिक**

| जिल्हा | | लक्षांक | | | | | साध्य | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनु.जाती | अनु.जमाती | महिला | इतर | एकूण | अनु.जाती | अनु.जमाती | महिला | इतर | एकूण |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

ब) अर्थिक (रुपये लाखात)

| **जिल्हा** | **बाब** | **तरतूद** | | | | | **खर्च** | | | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनु.जाती | अनु.जमाती | महिला | इतर | एकूण | अनु.जाती | अनु.जमाती | महिला | इतर | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

## परिशिष्ट 3

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान योजनेअंतर्गत ऊस विकास कार्यक्रम 2015-16

## वार्षिक प्रगती अहवालाचे प्रपत्र

मासिक अहवाल

कार्यान्वित अधिकारी – जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

अ)भौतिक

| जिल्हा | बाब | लक्षांक | | | | | साध्य | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनु.जाती | अनु.जमाती | महिला | इतर | एकूण | अनु.जाती | अनु.जमाती | महिला | इतर | एकूण |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

ब) अर्थिक (रुपये लाखात)

| | **बाब** | **तरतूद** | | | | | **खर्च** | | | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनु.जाती | अनु.जमाती | महिला | इतर | एकूण | अनु.जाती | अनु.जमाती | महिला | इतर | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

क) निविष्ठा पुरवठा

| प्रात्यक्षिकाचा प्रकार | निविष्ठाचे नाव | परिमाण | दर रुपये | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

ड) प्रात्यक्षिकाचा दृष्य परिमाण

| **जिल्हा** | **निविष्ठा किंमत (रु.प्रति हेक्टरी)** | | **उत्पादन खर्च** | | **निव्वळ नफा** | | **अतिरिक्त नफा प्रात्यक्षिकामुळे (रु./हेक्टर)** | **नफा व खर्चाचे गुणोत्तर** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रात्यक्षिक | शेतकऱ्यांनी अवलंबलेल्या पध्दती | प्रात्यक्षिक | शेतकऱ्यांनी अवलंबलेल्या पध्दती | प्रात्यक्षिक | शेतकऱ्यांनी अवलंबलेल्या पध्दती | | |
| | | | | | | | | |

इ) विस्तार कार्य

| | **विस्तार कार्यक्रम** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **शास्त्रज्ञांच्या भेटी** | **शेतकरी सभा** | **शेती दिन** | **जनजागृती** | **बातम्या वर्तमानपत्र/रेडिओ** |
| | | | | | |

8) यशोगाथा

9) सनियंत्रण अहवाल

10) उपयोगिता प्रमाणपत्र (फॉर्म जीएफआर 19-अे)